Review Of Research
Vol. 3, Issue. 3, Dec. 2013
ISSN:-2249-894X Available online at www.ror.isrj.net

# *अध्यापन आणि साहित्य :एक अनुबंध*

**अशोक उत्तमराव घोळवे**
मराठी विभाग प्रमुख
कालिकादेवी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शिरूर (का.) जि.बीड.

## lkjka'k %

अध्यापन आणि साहित्याचा मराठी भाषाशिक्षकाच्या दृष्टीन अत्यंत महत्वपुर्ण सबंध आहे.साहित्याचे वाचन आणि आकलनाशिवाय त्याचे अध्यापन प्रभावी होउु शकत नाही.प्रभावी अध्यापनासाठी शिक्षक हा फक्त वाचक असुन चालत नाही तर तो रसीक असला पाहिजे.त्याला साहित्याचे जान असावी,कलेचे भान असावे. दृष्टी सौदंर्यावादी असावी. त्याचा दृष्टीकोन उच्च असावा तो जिवनसन्मुख असावा.अध्यापन घटकापेक्षा त्याने त्यात्या कवी - लेखक - नाटककार - निबंधकार यांच्य मुळ ग्रंथाचा अभ्यास केलेला असावा. त्याच्या जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टीकोणाचीही जाणीव असावी.त्याने तो लेखक - कवी साहित्यकार आदी समजुन घेतला पाहिजे.त्याच बरोबर भाषेचे व्याकरण,शुध्दलेखनाचे नियम हे त्याला आवश्यकच आहेत.त्याला पर्याय असत नाही.त्याचबरोबर त्याला समकालीन वत्तपत्रे,साप्ताहिके,साप्ताहिक पुरवण्या,मासिके,पाक्षीके,त्रैमासिके,दिवाळी अंक,त्याने नजरेखालुन घातलेले असावेत.म्हणजे त्याला साहित्याचा इतिहास,भुगोल या बरोबरच भुतकाळ वर्तमानकाळ व या काळातील साहित्याचे वारसदार कोण आहेत याचीही माहिती त्याला असली पाहिजे. साहित्याच्या अभ्यासांकडुन मी फार आपेक्षा व्यक्त करतो असे आपल्यापैकी कुणाला वाटण्याचा संभव आहे.परंतु या अगदि सामान्य अपेक्षा आहेत.अनेक शिक्षकांना आपण काय शिकवितो याचेचे भान नसते.

## iLrkouk %

आपण शिकवत असलेला अभ्यास घटक हा कोणत्या वाड्मय प्रकारातला,प्रवाहातला आहे,हेच मुळी कळत नाही.म्हणजे अध्यापन हे निरस व दिशाहिन होते.छापिल साहित्याचे बोली भाषेत रूपांतर कय्न सांगणे म्हणजेच शिकविणे नव्हे.किंवा कवितेचा नुसता अर्थ सांगुन भागत नाही तर अर्थाची विविध वलये का ? व कशी ) निर्माण होतात.हे ही सांगीतले पाहिजे.लेखक/कवी/नाटककाराचा साहित्य लेखनामागील दृष्टीकोन कोणता ? आहे. तात्कालिक,सामाजिक,राजकिय,धार्मिक,सांस्कृतीक,आर्थिक परिस्थिती कशी होती. त्यात्या परिस्थितीचा अभ्यास शिक्षकांचा असला पाहिजे.त्यामुळे साहित्या अध्यापकाचा अभ्यास बहुश्रुत असला पाहिजे,परंतु आज खेदाने म्हणावे वाटते की,एकदा शिक्षकाची नोकरी लागुन चार - पाच वर्षे उलटुन गेले की वाचन व शिक्षक यांचे आंतर दुरावत जाते.घर,भविष्य,फॉमिली प्लॅनिंग यातच त्यांचा वेळ जातो.अन एक दिवस असा असतो की,घाई -गडबडीत शिक्षक वर्गात येतो आणि

विद्यार्थ्यांना विचारतो. "मुलांनो सांगा कुठला धडा चालु आहे. " "विद्यार्थी उत्तर देतात सर आठवा मग सर सांगतात घ्या "नववा. " ही बाब अध्यापकाच्या अद्यापतनाची पहिली पायरी आहे.

**शिक्षणाचे मुख्य उदीष्ठ -**

१) देशप्रिती,राष्टीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव, विज्ञाननिष्ठा, सामाजिक जाणिव,नैतीक मुल्ये, मानवता, निसर्गप्रेम, सुचिता, न्याय, समता, बंधुता, निर्भयता, स्वालबंन, श्रमप्रतिष्ठा, यांची जोपासना शिक्षणतुन झाली पाहिजे, परंतु असे होतांना दिसत नाही.

पण त्यापेक्षा अधिक अभ्यासमडंळ जबाबदार आहे.

२) कारण आमच्या पहिल्या वर्गापासुनच विद्यार्थ्यामध्ये संभ्रमाला सुरूवात होते.उदा. - "अ" अननसाचे सर सांगायचे हे फळ आहे.मग प्रश्न पडतो की,जी फळं आम्ही खातोत,बघतोत त्या फळात हे फळ नाही.हा प्रश्न बालसुलभ मनाला पडल्यावाचुन राहणार नाही. आ आगगाडीचा "ॠ", "फ" फनसाचा या शब्दापासुनच आमच्या मेंदुत घोळ निर्माण करण्याचे षडयंत्र सुरू होते.माझे उदाहरण देतो.अननस नोकरी लागल्यास खाल्ले.एम.ए.ला औरंगाबादला असतांना आगगाडीत बसलो.ऋषी आणखी पाहिला नाही.फनस या जूनमध्ये पाहिले आणि खाल्ले.अशी जर आमच्या शिक्षण प्रयक्रिेची सुरूवात होत असेल तर मुलांना शिक्षणात गोडी लागण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही .

शिक्षकही शिकवतात, त्यातुन नवनिर्मिती होत नाही. तर जे दवास्तव आमच्या भोवती घडते.दिसते, त्या आधारे शिक्षणाची सुरूवात व्हायला पाहिजे.त्याशिवाय शिक्षणात रस वाटणार नाही.एका सर्वेक्षणावरून १० लाख ते ३ कोटी ६ ते १४ वयोगटातील मुले शाळेबाहेर राहिलेच नसते. या बाबीला फक्त शिक्षकच जबाबदार असतात असं नाही, तर त्या विद्यार्थी, पालक, मुख्यध्यापक/प्राचार्य, संस्था, शासन ही कमी अधिक प्रमाणात जबाबदार आहे.

भारत हा खेडयाचा देश आहे.निदान महाराष्ट्र हा मराठी भाषिकांचे राज्य असले तरीही बहुसंख्य लोक खेडयात राहतात. मग आमच्या अभ्यासक्रमाची रचना ही खेडयांना समोर ठेऊन व्हायला पाहीजे. कारण जेव्हा जमिनीवरील शेण उचलतो तेव्हा त्याला खालुन माती चिटकलेली असते. ही माती संस्कार देत असते. पुर्ण माती झाडुन शेण जसे स्वच्छ करता येत नाही तसे ग्रामीण विद्यार्थ्यांना तर त्याच्या संस्काराशिवाय शिक्षण दंणं हे चुकीचे आहे. त्याला त्याच्या मातृभाषेत शिक्षण दिले पाहिजे. प्रादेशिक दृष्टीने महाराष्ट्राचे पाच प्रशासकीय व सांस्कृतिक दृष्टया पाच विभाग पडतात.त्यात मराठवाडयातील मराठीचा अभ्यासक्रम हा येथील बोलीभाषेत असायला हवा परंतु तसे न करता तो नागर भाषेत आहे. त्याच्या अभ्यासमंडळाच्या यादीवर नजर फिरवल्यानंतर सहज लक्षात एक बाब प्राकर्षाने दिसुन येते की ही सर्व मंडळी पुण्याची त्यातही एकाच वर्णतली त्यामुळे अभ्यासक्रम हा ही त्यांच्याच अंगाने निर्माण करतात.

एकुणच अभ्यासक्रमाच्या क्रमिक पुस्तकांमध्ये ग्रामीण "साहित्याचे" प्रतिबिंब हे अत्याल्प प्रमाणात आपणाला दिसुन येईल.निदान प्राथमिक, माध्यमिक आणि उच्चमाध्यमिक वर्गाच्या मराठी अध्ययनात ग्रामीण साहित्याला ७० ते ७५ टक्के का होईना स्थान असायला पाहिजे. पण ते प्रमाण आपल्यासमोर मांडतो, पाचवीच्या वर्गात "बाप" ही इंद्रजित भालेरावांची एकमेव ग्रामीण जीवनाचे प्रतिनिधीत्व करणारी कविता सोडलीतर सखोल ग्रामजीवन आढळत नाही. एकुण १९ कविता आणि पाठा पैकी तिनचार कविता व एक लेख एवढेच ग्रामीणत्वाची साक्ष देतात. सहावीत दोन कविता सातवीत ३० पैकी ३ कविता ग्रामीण इत्यादी जर आमच्या ग्रामीण साहित्याला स्थान

दिले तर आमच्या पुढच्या पिढीला ग्रामजीवन हे काय आहे? शेतकरी हा कोण आहे? त्याची पिके कुठे आणि कशी येतात? दुध कोण देते गाय का गवळी? याचा प्रत्यय त्याला येणार नाही.

रा.ग.जाधव म्हणतात की,"बहुसंख्य ,शेतकरी, कामकरी,ग्रामीण कामगार आणि गाव वाडयातील शेकडो समुह यांचा कैवार घेणाऱ्या विचारवंताचे,साहित्यिकांचे विचार निटपणे समजावून घेऊन त्यांची एक न्याय व्यवस्था महाराष्ट्राच्या मध्यवर्ती विचार परंपरेत करण्यात आली नाही." एकुन ही विवंचना विचारवंत ग्रामीण साहित्यिकांच्या कविंच्या वाटयाला आली आहे. सांस्कृतिक वैचारिक आणि वांड्मयीन परंपरा ही त्या त्या कालखंडात तात्कालिन प्रभावी अशा विविध प्रकारच्या घटकांनी घडलेली असते.म्हणुन शिक्षक हा प्रभावी वास्तवादी अभ्यासक असला पाहिजे. तो जर अभ्यासक नसेल त्याला सामाजिक परिवर्तनाची नव्या बदलाची वाड्मयीन जाण नसेल तर त्याला कविता निटपणे विद्यार्थ्यांना समजून देता येणार नाही. उदा. वसंत बापटांची बाभुळ झाड ही कविता पाहू.

"अस्सल लाकुड,भक्कम गाठ
ताठर कणा टणक पाठ
वारा खात-गारा खात
बाभूळझाड उभेच आहे."

या वर्णनात बाभुळझाडाच्या वर्णनापेक्षाही प्रतिकुल परिस्थितीत माणसाने तग धरूण उभे राहिले पाहिजे हे सांगण्याकडे कविचा कल आहे. गाटी गाठींनी तयार झालेल्या बाभळीच्या झाडाचा बूंधा. हे सांगण्याबरोबरच माणवी जीवनातील गुंतागुंत अडीअडचणी त्याला दुःखाचे सहन करावे लागणारे आघात, अस्मानी आणि सुलतांनी संकटांचा सामना करत उभा राहणारा शेतकरी,दुःख,दैन्य, दारिद्रय, अवहेलना अपमाण इत्यादी सहन करत तो जगतो आहे. हे सांगता आले पाहिजे तेव्हांच काही साध्य होईल.

शिक्षकाला पर्यावरणाशी जर समरस होता आलेतरच त्याला या बाभळीच्या झाडाचे नवल वाटल्याशिवाय राहणार नाही. नाहीतर एक कविता संपली या आनंदात तो राहील. "बाप" ही इंद्रजित भालेरावांची कविता पाहु५ वी वर्गातील

"लेता आंगावर चिंध्या
खातो मिरची भाकर
काढी ऊसाची पाचट
जगा मिळाया साखर
काटा त्याच्या का पायी
त्यानं काय केलं पाप?"

बापाच्या व्यथा वेदणेबरोबरच बापाची विश्वात्मक दृष्टी शिक्षकांला सांगता आली पाहिजे. परंतु शिश्वाची कल्पना आभिव्यक्त करतांना त्यांच्यावरच अन्याय-नि अत्याचार कसे होतात हे सुशिक्षित म्हणावणाऱ्या त्यांच्याच मुलांकडून हे ही सांगता आले पाहिजे.

आज शेतकऱ्यांना सगळेच लुटायला बसले आहेत. त्यांची लुट ही एक दिवस संबंध शेतीव्यवसाय नेस्तनाभूत करेल. यासाठी शेतकऱ्याकडे सहानुभूतीने पहाण्याची दृष्टी शिक्षकाला निर्माण करता आली पाहीजे.त्याचा उदरनिर्वाह शेतीवर अंवलबुन आहे.शेती पिकली तर जग तग धरून उभे राहिल.नसता सिमेंट क्रॉकेटच्या जगात सिमेंट वाळु,डांबर, आणि लोखंड खाउन लोकांची पोटे भरणार नाहीत तर त्यासाठी अन्न हेच खावे लागेल हे ही त्या बालकाला विद्यार्थ्याला सागिंतले पाहिजे.असच जिवन चित्रित करणारा ग्रामीण जिवनाच्या विविधांगाचे प्रत्यकारी दर्शन घडविणारी,एक लेखक शंकर पाटिल " टारफुला " या कांदबरीवर आधारीत हा गद्यांश एका गावातील लोकांच्या परस्पर वैमनस्यातुन घडत जाणारी कथा.गावचे पाटील असणाऱ्या दादांना,केरूनाना आणि त्यांच्या कुंटुबियांच्या जीवीताची मनापासुन काळजी वाटत असते.केरूनानांना दादांचा विश्वास वाटल्यावर ते स्वसंरक्षणार्थ आपल्या आपल्या दोन मुलींना मर्दुमकीचे घडे कसे दिले हे पाटलांना दाखवायचे आहे. त्याने दादा चकित.प्रभावित आणि निश्चित होतात ; हा भाग इथे आला आहे.एकुणच शेती तेथील गाव गावातील प्रतिष्ठेच्या,कल्पना,त्यांचे हाडवैर,इर्षा,त्यांची अंधश्रध्दा,त्यांचा एकमेकांबध्दल असलेला भावनिक गुंता,नाते सबंध,नात्याची विन इत्यादी विद्यार्थ्यांना शिक्षकाला समजून देता आले पाहिजे. अशीच दहाविच्या वर्गातील एक कथा पाहु.रा.रं.बोराडे (रावसाहेब रंगनाथ बोराडे) यांचे लेखन मराठवाडी वळणाचे,त्यांच्या लेखनात उस्मानाबाद - लातूर यांच्य सिमारेषेवरील बोली भाषेचा प्रभाव आहे.त्यातलीत्यात त्यांचा सबंध साहित्यावर " मराठा " समाजाच्या वर्तनाच्या कथा आहेत असे खुद त्यांनीच सांगीतले आहे. तर त्यांची " रूसवा " ही कथा माणुस,कुटुंब व समाज यांचे नाते व त्यालीत गुंतागुंत उलगडण्याचा प्रयत्न या कथेतुन झलेला आहे.ग्रामीण जीवनात स्त्रीच्या व्यथा वेदना,त्यांच्या नाते संबंधात स्त्री हत्यार म्हणुन कसी वापरी जाते.तर " आमचे केस त्यांच्य पायाखाली गुंतलेलें आहेत. " ही नात्यातील कटूता व्यक्त करणारी भावनीक गुंतागुंत ही माहिती असली पाहिजे.ही कथा शिकवण्यासाठी मुळात " नातीगोती " हा त्यांचा कथासंग्रह तरी वाचला पाहिजे त्या शिवाय त्याचे निट अध्यापन शिक्षकाला करता येणार नाही. " लोभी वृत्तीच्या जावयाला हणमंतरावांनी युक्तीने,सावित्रीने धीट वृत्तीने आणि रानबाने रोकठोक भुमिका घेवुन कसे वठणीवर आणले हे कळते.तसेच वडील आपल्या मुलीच्या संसाराची काळजी घेत सर्वांची माने सांभाळण्यात कसे यशस्वी होतात हे ही पाहवयास मिळते.

शेतकऱ्यांची परिस्थिती म.फुले यांच्या पाठात दारिद्रयाने गांजलेल्या शेतकऱ्याला सोबत घेउन सरकारला कसे धारेवर धरले याचे चित्रण त्यांनी केले.एकुणच शेती व्यवसाय हा तोटयाचा व्यवसाय म्हणुन पाहिले जाते.त्यातच शेतकऱ्यांची एनकुन मार्गाने कसी लायलुट केली जाते.तेव्हां म.फुले लिहित " शेतकऱ्यांनी आपल्या बायकामुलांसह रात्रंदिवस शेतात खपावे,तरी ही त्याला शेतसारा वजा करून आपल्या कुटूंबातील दर माणसी दर महा तीन - तीन रूपये ही पडत नाहीत. ""शेतसारा लोकलफंड ही अन्यायची महसूल म.फुले यांचे समग्र साहित्य वाचल्याशिवाय शिक्षकाला सांगता येणार नाही. " एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ " " एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ " म्हणानारा सहकार मला " साह्य करा मी जगतो तुम्ही जगा की मरा याशी मला देनंघेनं नाही ". ही नवी वृत्ती वर येउु लागली आहे.त्यातुनच आदरणीय गुरूवर्य डॉ.वासुदेव मुलाटे यांची " विषवृक्षाच्या मुळया " सकारत जाते.भ्रष्टाचाराचा विषवृक्ष हा किती खेलपर्यंत गेला आहे.त्याच बरोबर राजकारणी इ नोकरशहा किती जबाबदार आहेत. त्याचबरोबर डॉ.मुलाटे सर हे एक बँकेत वसुली अधिकारी होते.ते वसुलीला गेल्यानतंर त्या शेतकऱ्याची माणसिकता,त्याची आगतीकता,पैसे फेडावा वाटतो पण ऐपत नाही.यासाठी त्यांची जीवघेणी धडपड ही मुलाटेसरांनी पाहिली याची जाणीव होण्यासाठी शिक्षकाला फक्त "विषवृक्षाच्या मुळया " वाचून चालणार नाही. तर त्यासाठी मुलाटे सरांचे जीवन चरित्रही वाचावे लागेल,त्यांच्य जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोनही अवगत करावा लागेल त्याशिवाय त्यांचे

समग्र साहित्य समजणार नाही. ग्रामीन जीवनाचा साहित्याचा परिद्य उत्तोरोत्तर वाढत आहे.अलीकडे जागतीकीकरणाचे वारे वाहू लागलेले आहेत.यातच नवनवीन वृत्ती प्रवृत्ती बरोबरच भ्रष्टाचारही आरपार नोकर व्यवस्थेत घुसला आहे.सहकार हा स्वहकार बनत चालला आहे.

"चिकाळा " हा एम.ए. च्या वर्गासाठी असणारा प्रा.भास्कर बडे यांचा कथासंग्रह तो कथासंग्रह शिकवत असतांना सबंध भास्कर बडे हे काय अजब रसायन आहे.? त्यांच्य साहित्यातुन जाणवणारी उसतोड शेतकरी कामगार शेतकऱ्याची अगतीकता,त्यांचे वैफल्यग्रस्त जीवन,त्यांच्या वाटयाला येणारी अपमाण,अवहेलना,त्यांचे दु:ख इ.बरोबरच बीड आणि अहमदनगर जिल्हयाच्या सिमारेषेवरील जीवन काय आहे?शिरूर तालुका नेहमी दुष्काळ सदृश्य तालुका त्यांचे होणारे हाल अपेष्टा ह्या प्रा.डॉ.बडेंच्या साहित्यात येतात.हे समग्र बडे यांचे साहित्य वाचल्याशिवाय दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या वंजारी समाजाचे जीवन शिक्षकाला कळणार नाही.त्यांच्या करारी बाना,लढावू वृत्ती ,निष्ठा आक्रमकता,विश्वासूपणा इ.जातीतील गुणवैशिष्टये समजनार नाहीत.यासाठी शिक्षकाने लेखक, कवी, नाटककार, नट, शेतकरी, राजकारणी, सांस्कृतीचा पोषक घटक इ.भूमीका बजावल्याशिवाय परिणामकारक आणि प्रभावी साहित्य अध्यापन करता येत नाही.

शेवटी साहित्याचा आणि अध्यापनाचा असा जवळचा संबंध आहे.साहित्य अभ्यासामुळे शिक्षक हा सभोवतालच्या जीवनाकडे गांभीर्याने पाहणारा एक सजग नागरीक होतो.म्हणुन तो विद्यार्थ्यांनाही उत्तम नागरीक म्हणुन निर्माण करू शकतो.त्याच्यावर ग्राम जीवनाचे संस्कार करू शकतो.त्यातुन मुलांना चौकस व संवेदनशिल,भावनिक होण्यास शिक्षकाच्या साहित्याभासाचा अध्यापनात उपयोग होतो. आज मीतीला साहित्य व समाज समांतर जात असतात.समाजासमोरील अव्हाणे शिक्षणातून विद्यार्थ्यांना मिळायला पाहिजेत.परंतू ही अव्हाणे आमच्या संदर्भ ग्रंथात अभावानेच जाणवतात.त्यातुन चांगले लेखन करणारे साहित्यीक कवी बाजुला राहतात.अनं जूनंच उगळीत बसण्याची आमची वृत्ती फोपावत जाते.

शिरूर सारख्या ग्रामीण भागात लेखन करणारा कवी. "अनंत कराड" हा कवी सभोवतालच्या निरीक्षणातून बदलाची जाणीव देतांना म्हणतो.

घेई सरकी
लावी सार रवी
माय पारखी लेकराला
शेवटी - काटा कापसाला
तोटा धन्याला
मोठा सावकार
दरसालाला

ही माणसं पुण्या मुबंई पर्यंत पोचत नाहीत.म्हणुन मागे राहतात.त्यांच्य प्रतिभेवर झळाळी चडण्यापेक्षा काजळी चडते.व कालौखात नाहिसे होतात.

आज ग्राम जीवन आणि ग्रामीण साहित्य अभ्यासक्रम यामध्ये खुप अतंर पडले आहे.कधी नव्हे इतके जग या पाच वर्षात बदलले आहे.त्याचे लोन शाळा महाविद्यालयापासुन अंगणवाडी पर्यंत पसरले आहे.विज्ञान आणि तंत्रज्ञान ग्रामीण भागात पोचले आहे. बीना मातीची शेती उभी राहत नाही.शेतीतही काम्प्युटर आले आहे.बैल जाउ ट्रॅक्टर,हार्वेस्टर ,जेसीबी आली आहे.हा बदल साहित्यात येणे क्रमप्राप्त

आहे.पण अभ्यासक्रमातील क्रमीक पुस्तांतील जे जीवन आहे ते विद्यार्थ्यांना या बदलामुळे जाणवत नाही.परिणामी तो उदसिनतेने मराठीकडे पाहतो.यासाठी निरीक्षण,अभ्यास,हा अध्यापनावर मुलगामी परिणाम करू शकेल.यासाठी साहित्य अभ्यासाची नितांत गरज आहे.आणि तो अनुबंध असा ग्रामीण साहित्याच्या उदाहरणाने मी आपल्यासमोर मांडण्याचा नम्र प्रयत्न केलेला आहे.आपल्याला तो आवडला असेल अशी माझी खात्री आहे.